# ख्रिस्तात सुवार्ता देण्याची आता आमची पाळी आहे

*विश्वास गोरखनाथ वळवी,*
*संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा,*
*इतिहास विभाग,उमवि,जळगाव*

**प्रस्तावना:-**

ख्रिस्तात आता आमची पाळी आहे.देवाच्या मनुष्याला ख्रिस्तात कार्यशील असणे अत्यंत गरजेचे आहेसुवार्ताद्वारे ख्रिस्ताच्या संदेश आणि प्रीती देण्यासाठी आमची निवड झालेली आहे.का पण?स्वताला विचारण्याची आता माझीच जीम्मेवारी आहे.कि जे सुवार्तेचे महान कार्य मला दिलेले आहे.त्यात माझे स्थान आणि मी कितपत कोठे आहे.माझे कार्य परिणाम कारक आहे अथवा निष्क्रिय मी देवाचे कार्य पुढे घेऊन चालण्यास कितपत योग्य आहे.संत पौल सांगतो त्याप्रमाणे मीने योग्यता धारण केलेली आहे का?मी पवित्रशास्त्रात प्राविण्य मिळविलेले आहे का?देव एक मिशनरी म्हणून तुमच्या उपयोग करू इच्छितो पण मी काय त्या महान सेवेसाठी तयार आहे.देवाच्या शब्दाला प्रतिसाद देण्यासाठी मी तयार आहे,देवाशी प्रामाणिक राहण्यास मी तयार आहे.देवाने दिलेल्या उद्धेशाप्रती मी प्रामाणिक आणि कर्त्यव्यदक्ष आहे.देवाच्या कार्यात देवाने कधीही कोणावर जबरदस्ती केलेली नाही.पण देवाने तुम्हाला पकडून घेतले आहेआता तुम्ही एक ख्रिस्ती म्हणून त्याच्यापासून पडू शकत नाहीआता तुमची पाळी आहे ख्रिस्ताच्या संदेश आणि प्रीती याची सामान्य लोकांत रुजविण्याची,त्यांना उद्धार देण्याची ,त्यांना पवित्र शास्त्र देण्याची,त्यांना ख्रिस्ती समाजात समाविष्ठ करण्याची,त्यांना ख्रिस्त आणि देव देण्याची,आता तुमची पाळी आहे.

**सत्याच्या जोरावर आम्हाला ख्रिस्त देणे आहे:-**

"सत्याच्या जोरावर मन जिंकणारी माणसे कोणती?जी सत्यावर चालतात,जी सत्यपासून पळत नाही,जी सत्य अनुभवतात,जी सत्यासाठी आपले सर्वस्व वेचतात.व्होल्टेअर न्यूटन* बद्धल म्हणतो "आयझक न्यूटन हा सर्वात मोठा मनुष्य होय,तो सर्वात मोठा का?कारण आपण त्याच्याबद्धल मनात पूज्यबुद्धी बाळगतो,जो सत्याच्या जोरावर आपली मने जिंकतो,बळजबरीने दुसऱ्यांची मने जिंकू पाहणारांना आपण मान देत नाही." खरे पाहता हे शब्द मनुष्याच्या आदराचे आहे.पण एक ख्रिस्ती म्हणून मला कोणाला ख्रिस्त द्यायच्या असेल तर तो प्रेमाने,दिन-दुबळ्या लोकांची सेवा करून,लोकांना त्याच्या पापाचा बंधनातून सोडवून,त्यांना शारीरिक नाही तर आत्मिक उद्धार देऊन,त्यांना ख्रिस्त देऊन जो त्यांच्या पापासाठी क्रुसावर २०१९ वर्षापूर्वी चढला आणि तिसऱ्या दिवशी उठून त्यांच्यासाठी स्वर्गाचे द्वार खुले करून,मार्ग सत्य आणि अनंत जीवनाचा मार्ग खुला केलाअशा ख्रिस्त देण्याची आता आमची पाळी आहे.

**एक आशा झळकणाऱ्या ताऱ्याची:-**

"आणि जे समजणारे ते अंतराळाच्या प्रकाशासारखे झळकतील आणि जे पुष्कळांना न्यायीपणाकडे वळवतात ते ताऱ्यासारखे सदासर्वकाळ प्रकाशतील"(दानीएल:-१२-3) *दाऊद,मोशे,नुह,अब्राहम,इसहाक, याकोब,युसूफ,गिद्योन,हे पुरुष ज्यांनीविश्वासाद्वारे देवाची संमती प्राप्त करून घेतली होती आणि आज ते देवाच्या राज्यात सुर्यासमान चमकत आहे ...आता आमची पाळी आहे विश्वासाने देवाच्या राज्यात जाण्यासाठी,संमती मिळविण्याची.विश्वासाचे पुत्र म्हणून आमचे कार्य करण्याची वेळ आलेली आहे.सूर्य संपूर्ण पृथ्वीलाउजेळ पुरवितो,ख्रिस्ताचे लोक संपूर्ण जगाला ख्रिस्त पुरवितातआज प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीची हे कर्तव्य असून त्यांनी आपल्या जीवनाच्या शुद्ध चारीत्र्यातून ख्रिस्ताच्या प्रकाश जगाला ध्यावा,आता आमची पाळी आहे ख्रिस्तात सूर्यासारखी चमकण्याची,शुद्धतेत वर्तन करण्याची,पवित्र जीवन-यापान करण्याची.

**देवाच्या मनुष्याला कोण रोखणार:-**

देवाच्या मनुष्यासाठी खड्डे खोदणाऱ्यांना हे माहीत नाही,देवाने खड्डे पुरण्यासाठी स्वर्गदूत नेमलेले आहे

देवाच्या मनुष्याला मानसिक त्रास देणाऱ्यांना हे माहीत नाही,देवाची शांती देवाच्या लोकांच्या हृदयात नेहेमी वास करते.

देवाच्या मनुष्याला दुःख देणाऱ्यांना हे माहीत नाही.देवाने अनंतसुख त्यांच्या लोकांसाठी राखून ठेवलेले आहे.

देवाच्या मनुष्याला खोटे मार्ग दाखविणाऱ्यांना हे माहीत नाही.पवित्र आत्मा देवाच्या लोकांचे नेहेमी मार्गदर्शन करीत असतो.

देवाच्या मनुष्यावर खोटे आरोप ठेवणाऱ्यांना हे माहीत नाही, ज्याच्या पक्ष देव घेतो,त्याचा विरोधात कोण उभा राहील.

देवाच्या मनुष्याला अज्ञानी समजून त्याला मूर्ख म्हणणाऱ्यांना हे माहीत नाही.देवाचे भय बुद्धी आणि ज्ञान प्राप्त करून देते ते पवित्रशास्त्रातून.

आता ख्रिस्तात देवाच्या लोकांची पाळी आहे.त्यांनी आपल्या ज्ञानाने आणि बुद्धीने,आपल्या प्रेममय आणि शुद्ध चारीत्र्याने,पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने,ख्रिस्ताच्या महान आदेश पुढे न्यावा ,ख्रिस्तसंदेश जगाच्या शेवटापर्यंत न्यावा.

**श्रोत्यांना संदेशापेक्षा उपदेशकाकडे/मनोरंजनाकडे ओढण्याच्या परिणाम:-**

"जे जे पारकर* म्हणतात "स्वतःला पुढे करण्यामुळे अधिकार क्षीण व जीर्ण होतो.शब्दांनी व पद्धतीने उपदेशकाने सर्व लक्ष स्वतःकडे ओढवून स्वतःकडे लक्ष वेधने किंवा आत्मसन्मान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला आणि तो सांगत असलेल्या वचनाला नम्र प्रतिसाद दिला नाही तर कोणतेही दैवी अधिकार त्याच्यातून प्रवाहित होणार नाही,* कारण जे त्याला स्वतःला वाटत नाही ते तो इतरांना काय सांगणार?" उपदेशक हे देवाचे सर्वात मोठे अस्त्र आहे,आणि हे अस्त्र देव त्याच्या मुखातून निघणाऱ्या शब्दांद्वारे चालवीत असतो,आणि ही वचनांची,शब्दांची तलवार पापाचा,अशुद्धतेच्या नाश करते.पण आज भरपूर उपदेशक आत्मिकतेत लोकांना आकर्षण करण्याच्या पुरेपूर प्रयत्न करतात,आणि काही आताही प्रयत्नात आहे *मी अचंबित होतो,जेव्हा काही उपदेशक संदेश देतांना स्वतःला देण्याची प्रेरणा देणारे संदेश देतात,कारण देवाचे वचन आपण या साठी देतो की लोक दुसऱ्यांना द्यावे,आणि भरपुरीने द्यावे.याचा परिणाम,आज मंडळी स्थिर झाली आहे,कारण मंडळी आता मंडळींचा बाहेर दानच देत नाही,मंडळींच्या पाळकाशिवाय बाहेरील पाळक म्हणजे,संस्थात्मक,टीका करण्यासाठी,बाहेरील मंडळी म्हणजे काय तर जगिक,हे का झाले आहे?असा प्रश्न उद्भवतो तर,काही पाळकांच्या व्यक्तिकेंदी उपदेशाने?

आता व्यक्तिकेंद्री उपदेश अथवा संदेश म्हणजे काय? जेम्स डेनी हे व्यक्तिकेंद्री संदेशाची व्याख्या करतांना म्हणतात *"श्रोत्यांना संदेशापेक्षा उपदेशकाकडे ओढण्याचा प्रयत्न करणे अथवा देवापेक्षा माणसाकडे ओढण्याचा प्रयत्न करणे". देव सर्व जाणतो,देव सर्वव्यापी आणि सार्वभौम आहे,तरी देखील काही उपदेशकांना व्यक्तिकेंद्री संदेश देतांना लाज वाटत नाही.असे उपदेशक *ईश्वरविज्ञानाचे मनोरंजन* करू पाहतात आणि करतात.आता *ईश्वरविज्ञानाचे मनोरंजन म्हणजे नेमके काय?* *संत पॉल* म्हणतो _" जोपर्यंत एखादा पाळक देवाच्या वचनाशी विश्वासू आहे तो प्रयन्त त्याला देवाने दिलेल्या अधिकारात सेवा करण्याचा हक्क आहे,आपले वैयक्तिक ज्ञान किंवा मते,सांगून लोकांना तत्वज्ञान व ईश्वरज्ञान देण्यास पचारलेले नाही,तसेच ऐकणाऱ्यांच्या लहरी व पूर्वग्रहांना चेतवणारे मनोरंजक शब्द वापण्यास तर मुळीच पाचारलेले नाही.

एक व्हिडिओ मी पाहिला "एका मंडळीत जेव्हा स्तुती आराधना सुरू होती,लोक गोल रांगेच्या वेगवेगळ्या प्रकारचे आठ-दहा घोडके करून जसे लग्नात लग्नमंडळी नाचते त्याप्रमाणे ते सर्व लोक नाचून देवाची स्तुती-आराधना करीत होते.आता हे मनोरंजन होते असे म्हणावे का? उपदेशक ईश्वरविज्ञानाचे शिक्षण देतांना मनोरंजनाची मलाई लावून विश्वाशी लोकांची हृदये उचंबळून टाकतात करतात,आणि काही विश्वास लोक स्तुती-आराधना करतांना हे भान ठेवीत नाही की आपण लग्नमंडळीत नाही आहोत,आपण ख्रिस्ताच्या

दरबारात आहोत.आता ही गंभीर बाब आहे,किंवा नाही,का? कारण "देवाच्या सानिध्यात जातांना पवित्रता लागते आणि पवित्र वचन प्रचारीत करीत असतांना देवाचे भय लागते."

आता *देवाचे भय म्हणजे काय?* तर,वडील सांगतात आज चोरी केली तशी काल करू नकोस,काल मागून घेशील.देवाचे भय म्हणजे काय? या महिन्याच्या दहावा भाग मंडळीला दिला गेला नाही,तर काय झाले पुढच्या वेळेस देऊन टाकावे.देवाचे भय म्हणजे काय?आज प्रार्थना झाली नाही,तर काय झाले काल जास्त करून घेशील.हे ईश्वरविज्ञानाचे मनोरंजन तत्वे आहेत. *अशी तत्वे जर मंडळीत सुरू आहेतर देवाचे भय कसे निर्माण होईल.आता देवाचे भय काय आहे?आणि ते कसे निर्माण होईल.हे त्याच्या सानिध्यात जाणाऱ्या,एलिया,हनोक अथवा मुसा यांना आपण विचारू शकत नाही,आपण कोणाला विचारू शकतो? उत्तर आहे पवित्रशास्त्राला; पवित्रशास्त्र-जो मनुष्य देवाचे भय धरून वाचतो,देवाचे वचन जो मनुष्य भय धरू प्रचारीत करतो,देवाचे वचन घेऊन जो मनुष्य प्रामाणिक जीवन व्यतीत करतो,जो मनुष्य एक महान उपदेशक आणि तारणारा येशू ख्रिस्त यात तफावत करून ख्रिस्ताला प्रदर्शित करतो तोच खरा उपदेशक आहे,म्हणून *जेम्स डेंनी* म्हणतात _"तुम्ही एक महान उपदेशक आहात आणि येशु ख्रिस्त हा महान तारणारा आहे,ह्या दोन्ही कल्पना तुम्ही एकाच वेळी व्यक्त करू शकणार नाही".स्वतःला पुढे करण्यापेक्षा जो देवाला,ख्रिस्ताला पुढे करून आपले नाव आणि सर्वस्व पुसून जो उपदेशक संदेश देतो,तोच खरा उपदेशक होय *,तो लोकांना स्वतःकडे ओढत नाही तर पवित्र वचनाद्वारे ख्रिस्ताकडे,आणि ख्रिस्ताच्या महिमेसाठी लोकांना ओढत असतो.आता आमची पाळी आहे, खोट्या उपदेशकांचे आणि सुवार्तीकांचे अज्ञा आणि असत्य उजेळात आणण्याचे,जे उपदेशक आपल्या खोट्या ज्ञानाने आणि व्यक्तिमत्वाने अनेक सामान्य लोकांना अंधश्रद्धाच्या खाईत घेऊन जाता आहेत.त्यांच्या खोट्या शिक्षणाच्या आणि सिद्धातांच्या पडदा उघडण्याची वेळ आलेली आहे,आता आमची पाळी आहे.

**एका ख्रिस्ती व्यक्तीचा इतिहास:-**

सॅम्युएल ब्रेंगल लिहितो ‘’मनुष्याच्या जीवनाचे अंतिम मोजमाप हेच दर्शविते की,इतिहास हा मनुष्याच्या दर्जा किंवा पदवी,त्याला लाभलेली पदे,मानचिन्हे जाणत नाही,तर त्याच्या कृत्यांचे मोल आणि त्याच्या मनाचे व हृदयाचे चारित्र्य जाणतो.’’गंभीर आहे:-

१) *एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून तुम्ही करत असलेल्या धार्मीक कृत्यांचे मोल परमेश्वर ठेवतो का?*

धार्मिक कृत्ये हि फक्त लोकांच्या समाधांसाठी केली जात नाही,तर देवाचा उद्देश साध्य व्हावा म्हणून केली जातात.आणि हि कृत्ये मानचिन्हे अथवा सन्मानासाठी नाही तर देवाच्या महिमेसाठी करण्यात येतात.ख्रिस्ती व्यक्तीचे हे प्रथम कर्तव्य आहे कि त्यांनी आपले प्रत्येक कार्य देवाच्या महिमेसाठी करावे.आणि आता आमची पाळी आहे ख्रिस्तात देवाला महिमा देण्याची,हृदयातुन त्याला महिमा देण्याची,ख्रिस्त प्रथम आणि मी दुय्यम होण्याची,

२) *एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून तुमचे चारित्र्य आणि हृदय परमेश्वराला आवडते का?*

कारण ख्रिस्ती लोकांचा खरा इतिहास पृथ्वीवर नाही तर स्वर्गात लिहिला जातो.आणि म्हणून जेव्हा माझ्या इतिहासाचे मोजमाप होईल तेव्हा ते धार्मिक कृत्यांच्या आधारावर होईल,पण ती कृत्ये देवाच्या महिमेसाठी होती कि स्वत:च्या,ती कृत्ये देवाच्या योजनेत होती कि स्वत:च्या,ती कृत्ये देवाच्या लोकांच्या भल्यासाठी होती कि स्वत:च्या.देवाचे निकष आणि मोजमाप हि ख्रिस्ती लोकांच्या न पटणारी असेल पण तो अंतिम न्याय असणार आहे.प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती एक देवाच्या मिशनरी आहे आणि त्याने आपल्या कृत्यांतून फक्त आणि फक्त देवाची महिमा केली पाहीजे.आता आमची पाळी आहे कशाची..देवचं महिमेसाठी लागणाऱ्या कृत्यांची

**संदर्भग्रंथसूची-**


१) ख्रिस्ती श्रद्धा व आचरण,जॉन मेक्कवेड,जी एल एस प्रकाशन,प्रथमावृत्ती २०१५,मुंबई

२) The Heart of Man,All Nations Gospel Publishers,ISBN_0-908412-29

३) आत्मविश्वास कि कुंजी,स्वेड मॉर्गन,जी एस जी प्रकाशन,प्रथमावृत्ती,दिल्ली

४) Bakht Singh of India,T.E.Koshy,Authentic,First Edition,Hedrabad

५) बायबल सर्वेक्षण,डॉ जोएल,डॉ मायकल,डॉ गैराल्ड,एलेथिया प्रकाशन,प्रथमावृत्ती,२०१८ नाशिक